अपोमस(वा)/४५/नियो/१२६८ /२०२४
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
१९५, मोतीमहल, ६ वा मजला,
जे.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०००२०
दिनांक :- 19 APR 2024

**वाचावे** :- १) मोटर वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११२ मधील तरतुदी
२) अधिसूचना क्र. एम.व्ही.ए.०५८९/सीआर-१०६१-टीआरए-२, दि. १९/०५/१९९० आणि महाराष्ट्र शासन राजपत्रा मधील प्रसिध्द करण्यात आलेले असाधारण, भाग चार-अ, परिशिष्ट, दिनांक ३०/०९/२००२
३) सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय नवी दिल्ली अधिसूचना नं.१३७७, दि.०६.०४.२०१८
४) अपर पोलीस महासंचालक(वाहतुक),महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अधिसूचना क्रं. अपोमस(वा)/४५/ नियो/ ३१०५/२०१९, दिनांक २५/१०/२०१९.
५) पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, रायगड परिक्षेत्र यांचे जा.क्र./पो.अ./म.सु.प./रायगड परिक्षेत्र/वेगमर्यादा आढावा/४०८/२०२४, दि.१४/०४/२०२४.
६) पोलीस निरीक्षक महामार्ग पोलीस, पनवेल विभाग यांचे जा.क्र. ७६/२०२४, दि. १४/०४/२०२४.
७) प्रभारी अधिकारी म.पो. केंद्र बोरघाट यांचे जा.क्र. ३३३/२०२४, दि. १३/०४/२०२४.
८) अपर पोलीस महासंचालक(वाहतुक),महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे जा.क्र. अपोमस(वा)/४५/ नियो/ मुंबई-पुणे घाट विभाग वेग मर्यादा निश्चिती/११९७/२०२४, दिनांक १५/०४/२०२४.

## अधिसूचना

०१. ज्याअर्थी पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, रायगड परिक्षेत्र यांनी दि. १४.०४.२०२४ रोजी प्रस्ताव सादर केला आहे की, यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग (मुंबई-पुणे महामार्ग) हा एकूण ९४ कि.मी. चा असून या महामार्गावर कि.मी. ३५.५०० ते कि.मी. ५२.००० पर्यत घाट भाग (बोरघाट) आहे. सद्यस्थितीत या द्रुतगती महामार्गावरील समतल भागासाठी असलेली वेगमर्यादा १०० कि.मी. प्रति तास असून घाट भागामध्ये आल्यानंतर वेगमर्यादा ५० कि.मी. प्रति तास आहे. व्यवहारिक दृष्टया घाट भागातील नमुद वेग मर्यादा हलक्या वाहनांसाठी अत्यंत कमी असुन पुणे ते मुंबई वाहिनीवर अति तीव्र उतार असल्याने, नमुद ठिकाणी वाहनांना समतल भागातून १०० कि.मी. प्रति तास या प्रमाणे प्रवास केल्यानंतर घाट भागात आल्यावर वाहनाची वेग मर्यादा ५० कि.मी. वर आणताना वाहन चालकांना अड़चणी निर्माण होतात तसेच त्या दरम्यान वाहन चालकाने वाहनांचा वेग जलद गतीने कमी केल्याने अपघातांचे प्रमाण देखील अधिक असल्याचे दिसून आले आहे.

०२. ज्याअर्थी यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गाचे रस्त्याचे डिझाईन व घाट सेक्शनमध्ये झालेल्या रस्त्यांचे रूंदीकरण तसेच एमएसआरडीसी (MSRDC) कार्यालय पुणे , परिवहन विभाग, आयआरबी इंन्फ्रा डेव्हलपमेंट कार्यालय , पोलीस अधीक्षक ,महामार्ग पोलीस रायगड परिक्षेत्र, पोलीस निरीक्षक, महामार्ग पोलीस पनवेल विभाग, प्रभारी पोलीस निरीक्षक म.पो. केंद्र बोरघाट , प्रमुख आरेखक वाहतुक अभियांत्रिकी पथक यांची दि. १५/०४/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील बोरघाटातील वेगमर्यादेविषयीचे अभिप्राय विचारात घेता सर्वानुमते मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटात हलक्या वाहनांची वेगमर्यादेत बदल करणे आवश्यक आहे अशी आमची खात्री झाली आहे.

कृपया पाठीमागे पहा.....

०३. त्याअर्थी मोटर वाहन अधिनियम, १९८८ चे पोट कलम ११२(२) सोबत अधिसूचना क्र.एम.व्ही. ए.०५८९/सीआर-१०६१- टीआरए- २, दि. १९/०५/१९९० आणि महाराष्ट्र शासन राजपत्रामधील प्रसिध्द करण्यात आलेले असाधारण, भाग चार-अ, परिशिष्ट, दिनांक ३०/०९/२००२ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून मी **सुखविंदर सिंह**, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई, **यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग (मुंबई-पुणे महामार्ग) या रस्त्याकरीता व घाट भाग कि.मी. ३५.५०० ते कि.मी. ५२.००० याकरिता वाहनांच्या वर्गानुरुप महत्तम वेगमर्यादा सोबतच्या तक्त्याप्रमाणे निश्चित करीत आहे.**

०४. सदरची अधिसूचना आज दिनांक १९ / ०४ /२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

शिक्का

ADDL. DIRECTOR GENERAL OF POLICE (TRAFFIC) ★ M. S. MUMBAI ★

सत्यमेव जयते

S Singh
19/04/24

**( सुखविंदर सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रती,

१) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य
५) सर्व आयुक्त, महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य
६) प्रधान सचिव, परिवहन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
९) महासंचालक, माहीती व जनसंपर्क संचनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई **यांना विनंती करण्यात येते की, या अधिसूचनेची सर्व प्रमुख वृत्तपत्र, दूरदर्शन व न्युज चॅनेल या प्रसार माध्यमाद्वारे ठळक प्रसिध्दी देण्यात यावी.**
१०) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.
१२) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई **(यांनी सदरच्या अधिसूचनेप्रमाणे वेगमर्यादाविषयी फलक तयार करून योग्य ठिकाणी लावावेत.)**
१३) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१५) सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य
१६) पोलीस अधीक्षक, महामार्ग परिक्षेत्र, ठाणे, पुणे, रायगड, संभाजीनगर व नागपूर.
१७) मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
१८) मुख्य महाव्यवस्थापक, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मुंबई परिक्षेत्र
१९) मुख्य महाव्यवस्थापक, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर परिक्षेत्र
२०) सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२१) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२) सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२३) सर्व अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
२४) सर्व अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण
२५) सर्व अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.
२६) सर्व अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
२७) **संचालक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांना राजपत्रात प्रसिध्दी देणेकामी.**
२८) सर्व जिल्हा माहीती अधिकारी **यांना विनंती करण्यात येते की, या अधिसूचनेची सर्व प्रमुख वृत्तपत्र, दूरदर्शन व न्युज चॅनेल या प्रसार माध्यमाद्वारे ठळक प्रसिध्दी देण्यात यावी.**

**यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग (मुंबई-पुणे महामार्ग) या रस्त्याकरीता व कि.मी. ३५.५०० ते कि.मी. ५२.००० दरम्यानच्या घाट भागाकरिता अनिवार्य करण्यात आलेली वेगमर्यादा कि. मी./प्रति तास**

| अ.क्रं. | वाहनांचा प्रकार | वेग मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | समतल भाग | घाट भाग |
| ०१ | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकासह ८ प्रवासी यांचे वाहतुकीसाठी केला जातो. **(एम-१ श्रेणीतील वाहने)** | १०० कि.मी. /प्रति तास | **६० कि.मी./प्रति तास** |
| ०२ | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकासह ९ किंवा त्यापेक्षा जास्त प्रवासी यांचे वाहतुकीसाठी केला जातो. **(एम-२ व एम-३ श्रेणीतील वाहने)** | ८० कि.मी. /प्रति तास | ४० कि.मी./प्रति तास |
| ०३ | मोटार वाहने ज्यांचा उपयोग माल/सामान वाहतुकीसाठी केला जातो. **(सर्व एन श्रेणीतील वाहने)** | ८० कि.मी. /प्रति तास | ४० कि.मी./प्रति तास |
| ०४ | दू-चाकी मोटार वाहने | परवानगी नाही | परवानगी नाही |
| ०५ | चारचाकी मोटार रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही |
| ०६ | तीन चाकी मोटार वाहने/ रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही |

ADDL. DIRECTOR GENERAL OF POLICE (TRAFFIC) M. S. MUMBAI

19/04/25

**( सुखविंदर सिंह )**
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.